CNR No.MHYA230012132020

## निशाणी क्रमांक ३९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज ऋणको क्र.१ यांनी मालमत्तेचा लिलाव रद्द करण्याबाबत दाखल केला आहे. धनकोनी प्रस्तुत अर्जावर तिव्र हरकत घेतली आहे.

२) प्रस्तुत अर्जावर ऋणको क्र.१ याने मालमत्तेचा लिलाव रद्द करणेबाबत एकूण तीन मुद्दे मांडले आहेत. त्यापैकी पहिला मुद्दा असा आहे की, लिलावात असलेली मालमत्ता ही ऋणको यास एकत्र कुटुंबाच्या वाटणीमध्ये प्राप्त झालेली असून ती एकमेव मालमत्ता त्याच्याकडे आहे. जर मालमत्तेचा लिलाव झाल्यास त्याच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. दुसरा मुद्दा असा उपस्थित केला आहे की, धनकोने मालमत्तेची ओळख पटविण्यासाठी आवश्यक दस्ताऐवज दिलेले नाहीत तसेच मालमत्तेच्या चतुसीमा दर्शविल्या नाहीत. त्याचप्रमाणे शेवटचा मुद्दा असा मांडला आहे की, संपूर्ण मालमत्तेचा लिलाव करता येणार नाही.

३) ऋणकोचे विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादात या तीन मुद्दयापैकी शेवटचा मुद्दा म्हणजेच संपूर्ण मालमत्ता लिलावात विक्री करता येणार नाही यावर भर दिला. त्यांनी त्यांच्या युक्तीवादादरम्यान ***भिकचंद धोंडीराम मुथ्था ..वि..शामबाई धनराज गुगळे २०२४(६) एस.सी.आर.६२४*** या आदरणीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा हवाला दिला.

४) धनकोचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, त्यांच्यातर्फे मालमत्तेची ओळख पटविण्याकरीता योग्य ती कागदपत्रे दिलेली आहेत त्यामुळे ऋणकोने जो मुद्दा मांडला आहे त्यात कसलेही तथ्थ नाही. त्याचप्रमाणे ऋणकोने कर्ज घेतेवेळी सदरची मालमत्ता गहाण ठेवलेली आहे. त्यामुळे इतर दोन ही मुद्दे मांडले आहेत त्यात देखील कसलेली तथ्थ नाही म्हणून अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

५) ऋणको याने प्रस्तुत अर्जात मांडलेले मुद्दे व प्रकरणातील कागदपत्रे याचे अवलोकन केले. नि.क्र.३१ वरील आदेशानुसार धनको यांची हुकुमनाम्याअंतर्गत रक्कम रुपये २३,८४,४०८/– इतके रकमेच्या वसुलीकरीता ऋणको क्र.१ याची मालमत्ता सर्व्हे नंबर १३६पैकी ०१ हे.२४आर व ऋणको क्र.२ यांची मालमत्ता सर्व्हे नंबर ६४ पैकी १हे. ६२ आर या दोनही मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्याबाबतचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदर दोनही मालमत्तेचे सातबारे उतारे दाखल करण्यात आलेले आहेत. ऋणको क्र.१ यांच्या सर्व्हे नंबर १३६ चा सातबारा उतारा पाहीला असता त्यामध्ये धनको यांच्याकडे ही मालमत्ता गहाण ठेवल्याची नोंद आहे. सदर वसुलीकरीता धनकोने सातबारे उतारे दाखल केलेले आहेत. हे सातबारा उतारे मालमत्तेची ओळख पटविण्यास योग्य आहेत म्हणून ऋणको यांनी मांडलेले मुददयात कसलेली तथ्थ दिसून येत नाही.

६) उपरोक्त ***भिकचंद*** या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता

हुकुमनाम्याचे संपूर्ण समाधान करण्याकरीता ऋणकोची संपूर्ण मालमत्ता विक्री करण्याची आवश्यकता नाही असा त्यामध्ये निर्वाळा दिल्याचे दिसून येते. उपरोक्त न्यायनिर्णयामध्ये हुकुमनाम्याची रक्कम फार थोडया प्रमाणात म्हणजेच रुपये १७१२०/– इतकी होती व त्याच्या वसुलीकरीता तीन मालमत्ता जप्ती करण्यात आली होती, त्यामुळे ऋणकोची संपूर्ण मालमत्ता हुकुमनाम्याच्या समाधानाकरीता विक्री करता येणार नाही असा निर्वाळा दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये हुकुमनाम्याची एकूण रक्कम रुपये २३,८४,४०८/– इतकी आहे म्हणजेच फार मोठी रक्कम आहे. उपरोक्त न्यायनिर्णयातील वस्तुस्थीती व या प्रकरणातील वस्तुस्थीतीमध्ये भिन्नता आहे म्हणून उपरोक्त न्यायनिर्णय या प्रकरणात लागू होणार नाही असे मी या ठिकाणी सन्मानपूर्वक नोंदवितो. सबब, ऋणको यांनी मांडलेले संपूर्ण मुद्दे विचारात घेण्यायोग्य नाहीत म्हणून पुढील प्रमाणे आदेश करीत आहे.

## **आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BHURE HEMANT SATWARAO
Date: 2025.03.06 17:40:23 +0530

दिनांक ०६/०३/२०२५

( **हेमंत एस.भुरे** )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
उमरखेड

**लवाद प्रकरण नियमित वसुली अर्ज क्र.१०१३/२०१९**
**दि.जनता कमर्शियल को–ऑप बँक लि...वि..सुभाष चिन्नावार**

## दा ख ला

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | रविंद्र रा. वरणकार |
| न्यायालयाचे नांव | :– | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, उमरखेड |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | :– | ०६/०३/२०२५ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०६/०३/२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०६/०३/२०२५ |